# महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद, भंडारा.
## सभा दिनांक 09. 09. 2024 कार्यवृत्त.

जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत विषय समितीचे मा. सभापती, श्रीमती स्वाती नरेंद्र वाघाये, महिला व बाल कल्याण समिती यांनी दिलेल्या सुचनेनुसार यांच्या अध्यक्षते खाली त्यांचे कक्षात सभा दिनांक 09. 09.2024 रोजी दुपारी ठीक 01.00 वाजता मासिक सभेचे आयोजन करण्यात आले. सदर सभेला मा.सभापती, तसेच मा. समिती सदस्या (सर्व), विभाग प्रमुख जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बालविकास, जिल्हा परिषद, भंडारा तथा समिती सचिव श्रीमती मनिषा कुरसंगे, बालविकास प्रकल्प अधिकारी, प्रकल्प साकोली येथिल श्रीमती योगीता परसमोडे, अतिरिक्त कार्यप्रभार प्रकल्प मोहाडी, प्रकल्प तुमसर बा.वि.प्र.अ.प्रभारी श्रीमती सुनिता पटले पर्यवेक्षीका, भंडारा बा.वि.प्र.अ. प्रभारी श्रीमती छाया ढोरे पर्यवेक्षीका, पवनीबा. वि.प्र.अ. प्रभारी श्रीमती सुनंदा बावणकुळे पर्यवेक्षीका, लाखनी प्रकल्पाचे बा.वि. प्र.अ. श्री प्रकाश मेंढे व अतिरिक्त कार्यप्रभार लाखांदूर, विभाग व प्रकल्पातील अधिकारी, कर्मचारी , पर्यवेक्षिका उपस्थित होते. समिती सचिव तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बाल विकास विभाग श्रीमती मनिषा कुरसंगे यांनी सदर सभेला उपस्थित मा. सभापती व मा.सदस्या यांचे स्वागत केले. सभेला आवश्यक असणारी उपस्थिती / गणपुर्ती पुर्ण झाल्याने सभाध्यक्षांच्या परवानगीने सभेला सुरुवात करण्यात आली.

| अ.क्र. | विषय / मुद्दा | संबंधीत विषयाशी निर्णय / करण्याची कार्यवाही |
|---|---|---|
| 1 | मागील सभेचे कार्यवृत्त दिनांक 14.08. 2024 चे वाचुन कायम करणे. | मागील सभेच्या कार्यवृत्तातील विषयावर सभेत वाचन करुन चर्चा करण्यात आली . सभेत सदर विषय / ठरावावर सभेत उपस्थित सदस्यांनी विना विरोध कायम करण्यास सहमती प्रदान केली . अंतीमत: मागील सभेचे कार्यवृत्त दिनांक 14.08. 2024 चे वाचुन कायम करण्यात आले. |
| 2 | शासन निर्णय / शासकीय परिपत्रकांचे वाचन करणे. | दिनांक 09.09.2024 मासिक सभेचे पुर्वी कोणतेही शासन पत्र / निर्णय प्राप्त झालेले नाही. अशी माहिती सभेत सादर करण्यात आली. |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 3 | सन 2024 - 2025 या आर्थीक वर्षातील योजनांचा आढावा बाबत . | समिती सभेत मा. सभापती श्रीमती स्वाती वाघाये यांनी सभेत बालविकास अधिकारी यांचेकडून प्रकल्पा अंतर्गत कामकाजाची माहिती घेतांना सद्यास्थितीपर्यंत कार्यान्वित केलेल्या कामांचा माहिती अहवाल सादर करण्याचे सुचना दिल्या. त्यानुसार सर्व प्रकल्पांचा आढावा सभेत संबंधित तालुका प्रकल्प अधिकारी यांनी सादर केला.<br><br>साकोली व मोहाडी प्रकल्पातील शासकिय योजनांचा व कामाचाआढावा श्रीमती योगीता परसमोडे, बालविकास प्रकल्प अधिकारी, यांनी अहवाल सादर केला.<br><br>प्रकल्प लाखनी येथील मुळ कार्यप्रभार तसेच लाखांदुर प्रकल्पाचा अतिरिक्त कार्यप्रभार असल्याने शासकिय योजनांचा व कामाचा आढावा बालविकास प्रकल्प अधिकारी, श्री प्रकाश मेंढे यांनी सादर केला.<br><br>भंडारा प्रकल्पाचा आढावा प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती छायाढोरे, पर्यवेक्षीका यांनी शासकिय योजनांचा व कामाचा आढावा सादर केला.<br><br>पवनी प्रकल्पाचा आढावा प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी. श्रीमती सुनंदा बावणकुळे पर्यवेक्षीका यांनी शासकिय योजनांचा व कामाचा आढावा सादर केला.<br><br>बालविकासप्रकल्प् अधिकारी (प्रभारी). तुमसर येथील श्रीमती सुनिता पटले, पर्यवेक्षीका यांनी शासकिय योजनांचा व कामाचा अहवाल सादर केला.<br><br>सभेत उपस्थितीत मा. सदस्यांनी शासन पत्रानुसार अंगणवाडी मदतनिसची रिक्त असलेली पदे भरण्याकरिता प्रकल्पांनी भरती प्रकरणीचा जाहीरनामा जाहीर करण्यात यावे . अशा सुचना सभेत दिल्या.<br>मा. सभापती यांनी अंगणवाडी मदतनिसची रिक्त असलेली पदे भरण्याकरिता बालविकास प्रकल्प अधिकारी. सर्व यांना सुचना दिल्या. |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 4 | निधीमध्ये मराठी - इंग्रजी टायपींग प्रशिक्षण टॅली प्रशिक्षण | टॅली कोर्स ( Tally Course )<br><br>जिल्हा परिषद, भंडाराचे सन 2024-25 या वर्षातील प्रथम अंदाजपत्रकात महिला व बाल विकास विभागाकरीता रुपये 3,21,00,000 निधीमध्ये मराठी - इंग्रजी टायपींग प्रशिक्षण करिता रुपये 1000000/- उपलब्ध केलेला आहे.<br><br>जिल्हा परिषदामधील महिला बाल कल्याण समितीने राबवावयाच्या योजना शासन निर्णय क्र.76 दि.24/1/2014 अन्वये गट अ प्रशिक्षण व सक्षमिकरण अंतर्गत मुलींना व महिलांना व्यावसायिक व तां त्रि क प्र शि क्षण - मराठी - इंग्रजी टायपींग प्रशिक्षण इत्यादि प्रशिक्षण स्थानिक पातळीवरील गरज लक्षात घेवून प्रशिक्षण आयोजित करण्याचे आहे. तां त्रि क प्र शि क्षण - मराठी - इंग्रजी टायपींग प्रशिक्षण - संबंधीत टॅली प्रशिक्षण ही योजना राबविण्याचे सभेत ठविण्यात आले.<br><br>समिती सभेत सर्व सम्मतीने संगणक प्रशिक्षण संबंधीत टॅली प्रशिक्षण आयोजन करण्याचे सभेत मा. सभापती श्रीमती स्वाती वाघाये यांनी मंजुरी प्रदान केली.<br><br>सदर योजनेस मा. सभापती यांनी मुलींकरीता उपयुक्त अशी योजना असल्याचे सांगून मराठी - इंग्रजी टायपींग प्रशिक्षणकरिता रुपये 1000000/- उपलब्ध असलेला निधी टॅली या योजनेवर खर्च करण्याची मंजुरी प्रदान केली.<br><br>लाभार्थी योचकडून कोणताही हिस्सा वसूल न करता सरसकट रु.5000/- प्रमाणे लाभ देण्यात यावा असे समिती सभेत ठरविण्यात आले. |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | संगणक प्रशिक्षण | संगणक प्रशिक्षण<br><br>जिल्हा परिषद, भंडाराचे सन 2024-25 या वर्षातील प्रथम अंदाजपत्रकात महिला व बाल विकास विभागाकरीता रुपये 3,21,00,000/- निधीमध्ये संगणक प्रशिक्षण करिता रुपये 2480000/- उपलब्ध केलेला आहे.<br><br>जिल्हा परिषदामधील महिला बाल कल्याण समितीने राबवावयाच्या योजना शासन निर्णय क्र.76 दि.24/1/2014 अन्वये गट अ मधील क्र. 4 मध्ये इयत्ता 7 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण ही योजना राबविण्याचे नमुद आहे.<br><br>संगणकाचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करण्यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त असल्याचे समिती सभेत चर्चेत आले .सदर योजना राबविण्यात आली पाहीजे अशा सुचना मा.सदस्या श्रीमती अनिता नलगोपुलवार यांनी सभेत सुचना दिल्या . संगणक प्रशिक्षण एम एस सी आय टी , एम केसि एल ला लागणारे शुल्क फी 4500/- प्रमाणे प्रती लाभार्थी देय असावी असे सभेत सगितले.<br><br>संगणक प्रशिक्षण ला लागणारे शुल्क फी 4500 प्रमाणे प्रती लाभार्थी समिती सभेत निश्चित ठरवून सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात आली. सभेत योजनेकरिता प्रकल्प निहाय लाभार्थी संख्या उपस्थित मा. सदस्या यांना सभेत ठरविले. यास मा. सभापती श्रीमती स्वाती वाघाये यांनी मंजुरी प्रदान केली.<br><br>सन 2024-25 या वर्षातील उपलब्ध निधी च्या अनुषंगाने विभागाने समिती सभेने मंजुर केलेल्या संख्येने तरतुद प्रकल्पांना वितरीत करावी . बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी योजनेची अंमलबजावणी करावी . |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| मा. सभाध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय. | मा. अध्यक्ष, यांचे परवानगीने सभेत वेळेवर येणारे विषय प्राप्त नसल्याने त्यावर कोणतीही चर्चा करण्यात आलेली नाही. |

महिला बालकल्याण समितीच्या आयोजित सभेला महिला बालकल्याण समितीचे मा.सभापती, श्रीमती .स्वाती वाघाये व सर्व मा. सदस्या उपस्थितीत होते सदर सभेच्या चर्चा सत्रात विषय / ठराव व इतर कार्यालयीन बाबी यावर चर्चा होऊन विभागातील तसेच प्रकल्पाचेअधिकारी व कर्मचारी यांना सुचना देवून खेळीमेळीच्या वातावरणात सभा संपन्न झाली.

सभेला उपस्थित मा.सभापती व सर्व मा.सदस्या, बालविकास प्रकल्प अधिकारी व विभाग प्रमुख जिल्हा कार्यक्रम अधिकारी, विस्तार अधिकारी तसेच इतर अधिकारी व कर्मचारी यांचे श्रीमती योगीता परसमोडे बालविकास प्रकल्प अधिकारी, साकोली यांनी आभार व्यक्त केले. मा.सन्मा. सभाध्यक्षांच्या परवानगीने व समिती सचिव तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांच्या निर्देशनानुसार सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

(श्रीमती मनिषा कुरसंगे)
सचिव, महिला बाल कल्याण समिती
तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी
(मबाकवि) जि.प.भंडारा.

(श्रीमती स्वाती वाघाये)
सभापती
महिला बाल कल्याण समिती
जिल्हा परिषद, भंडारा.

Scanned with OKEN Scanner